# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ६७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/१०/२०१६

**१) काठीने पाठीवर व कानावर धारदार वस्तुने मारुन जखमी केले . :-**

दिंनाक. ११/१०/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादी संतोष ताराचंद नागरे वय ३४ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड तुमसर हा आपल्या घरा समोर बसला असता यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीच्या घरा समोर येवुन काही कारण नसतांना शिविगाळ करुन काठीने पाठीवर व कानावर धारदार वस्तुने मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे तुमसर येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहनांची स्कुटरला धडक, एक जखमी . :-**

दिंनाक. १२/१०/२०१६ रोजी १२.३० वा. दर. यातील फिर्यादी चतुरभुज खेतन अहीरवार वय ६४ वर्ष, रा. जवाहरनगर हा आपल्या स्कुटर क्र. एमएच ३६ ई ४६०८ ने जवाहरनगर कडुन पेट्रोल पंपकडे पेट्रोल भरण्यास रोडाने जात असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे स्कुटरला धडक मारुन फिर्यादी हा स्कुटरसह रोडावर पडुन त्याचे उजवे पायाला व गुडघ्याला मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने आरोपीने अपघाताची माहीती न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे व रिपोर्ट वरून पो.स्टे जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) तलावाच्या पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :-**

दिंनाक. ११/१०/२०१६ रोजी १८.१५ वा. दर. यातील मृतक गोवर्धन यशवंत तरोने वय ३५ वर्ष, रा. सोनपुरी हा शारदा देवीचा विसर्जन करण्याकरीता गाव तलावावर जावुन शारदा मातेची आरती सुरु असतांना अंगावरील कपडे काढुन मी १ डुबकी मारुन येतो असे मित्र डिगबंर मांढरे यास सांगुन तलावाच्या खोल पाण्यात जावुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी रविन्द्र यशवंत तरोने वय २५ वर्ष, रा. सोनपुरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) वैनगंगा नदीच्या पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :-**

दिंनाक. १२/१०/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील मृतक गुलाब गेंदलाल पारधी वय ६० वर्ष, रा. नेहरु वार्ड मेंढा भंडारा हा मानसीक रुग्न असल्याने वैनगंगा नदी लहान पुलीया वरुन उडी मारुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी सुनिल गुलाब पारधी वय ३० वर्ष, रा. भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता